
# महाराष्ट्रातील ज्ञानपीठ




डॉ. उषा खंदारे

# अनुक्रम


| नाव | साल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| वि.स.खांडेकर | १९७४ | १ |
| वि.वा. शिरवाडकर | १९८८ | ८३ |
| विंदा करंदीकर | २००६ | १९९ |

# अंतरंग

कोणतंही चरित्रात्मक पुस्तक लिहायचं म्हटलं की, त्या त्या व्यक्तीचं जीवन आणि कर्तृत्त्व यांचं वाचन होत असतं. त्यामुळे नाही म्हटलं तरी त्यांच्या कर्तृत्वामुळे डोळे दिपून जातात, तर कधी मन भारावून जातं. वि.स.खांडेकर, वि.वा.शिरवाडकर आणि विंदा करंदीकर यांच्या साहित्याचं वाचन करीत असताना त्या त्या साहित्याच्या खोल डोहात जात असताना वर कधी येऊच नये असं वाटत होतं. प्रत्येकाचं साहित्य वेगळं आणि त्यातील अनुभूतीही वेगळी हा आस्वाद घेत असताना एक झपाटलेपण अनुभवलं हाही जीवनातील एक आनंदाचा अनमोल ठेवाच म्हणावा लागेल.

प्रत्येकाच्या साहित्याचा परीघ वेगळा. त्या परिघाच्या आत गेलं की, त्यांचे तेजोमय विविध पैलू, त्यांचं प्रभावी व्यक्तिमत्त्व, त्यांच्या यशाचा आलेख, त्यांचं अफाट कर्तृत्व आणि त्यांनी सांगितलेला जीवनाचा खरा अर्थ! यामुळे वाचनाबरोबरच स्वतःचही जीवनचिंतन होत गेलं. साहित्याप्रती असणारं त्यांचं अनमोल योगदान पाहता एक प्रकारची दमछाक झाली. हाही एक अनुभवच पण काहीतरी केलं पाहिजे असं मनाला उर्मी देणारा!

अनेक माणसांत रमणारे पण असामान्य असणारे सर्वांना आपल्या साहित्याच्या तेजाने दिपविणारे मराठी साहित्यातील खांडेकर, शिरवाडकर आणि करंदीकर महान साहित्यसम्राट!

या पुस्तकाची निर्मिती करीत असताना जो आत्मिक आनंद मिळाला तो अपूर्वच म्हणावा लागेल. या सर्वांच्या साहित्याचं वाचन करीत असताना मन भारावून जात होतं. तर कधी भूतकाळातील अनेक घटनांनी मन उचंबळून येत होतं. खांडेकरांच्या साहित्याचा आस्वाद घेत असताना अनेक आठवणी रूंजी घालीत होत्या. तीस चाळीस वर्षापूर्वी खांडेकरांच्या साहित्यातील उतारेच्या उतारे अनेकांच्या तोंडी पाठ असत. त्यावेळी माझाही अनुभव काहीसा असाच होता. तर कुणी त्यांच्या सुभाषितवजा वाक्यांनी भरलेली वही सदैव बाळगून त्यांचं सतत पठण करायचं. शिरवाडकरांच्या बाबतीतही असाच अनुभव मग ते काव्य 'पृथ्वीचे प्रेमगीत'

असो वा 'स्वप्नाची समाप्ती' अनेकांना त्यांच्या काव्यांनी व्याकुळ केलं तर कुणी प्रेमभावनेने समर्पण झालं. त्यांच्या 'कोलंबसाचे गर्वगीत' या गीतातून तर प्रत्येकाच्या मनात ध्येयाची आसक्तीच निर्माण केली. त्यांच्या अनेक नाटकांनी जीवनातील भेसूर सत्य सांगितलं तर महापराक्रमींनाही सामान्यासारख्या व्यथा आणि दु:ख असतं हे सांगितलं त्यांचं साहित्य म्हणजे चिरंतन मूल्यांचा ठेवाच! करंदीकरांनी तर 'देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे' या दोन ओळीतच जीवनाचा महान अर्थ सांगितला आणि दानाचं महात्म्यही सांगितलं.

या पुस्तकाच्या निमित्तानं पुन्हा एकदा ययातिचं वाचन झालं आणि त्यावेळी खांडेकरांनी मांडलेले विचार आजच्या काळातही किती उपयुक्त ठरतात हे पुन्हा एकदा अधोरेखित झालेलं दिसलं. अनेक अंगांनी केलेलं त्यांचं जीवनभाष्य हे वेगळ्याच भावविश्वात नेणारं आणि पुन्हा एकदा अंतर्मुख करायला लावणारं!

या सर्व साहित्यिकांचे दातृत्व, समाजाप्रती असलेली तळमळीची भावना, त्यांचे लोकोद्धाराचे कार्य, समाजातील अनेकांना सढळ हाताने केलेली मदत, हे सर्व वाचल्यावर मन प्रेरित होतं. त्यांनी निर्माण केलेलं साहित्य म्हणजे मराठी भाषेची केलेली एकप्रकारे सेवाच होय. आशय, सौंदर्य आणि शैली यांचा सुंदर आविष्कार म्हणजे यांचं साहित्य! साहित्यिक म्हणून ते श्रेष्ठ आहेतच पण एक माणूस म्हणून ते त्याहूनही श्रेष्ठ आहेत. म्हणूनच त्यांच्यापुढे विनम्रतेने नतमस्तक व्हावसं वाटतं.

एखाद्या लेखकाचं साहित्य जेव्हा वाचलं जातं त्यावेळी त्यांच्या साहित्याशीच निकटचा संबंध होत असतो. पण त्यांच्या चरित्रातून मात्र त्यांच्या जीवनातील घडलेल्या अनेक घटना, त्यातून उलगडलेलं त्यांचं पारदर्शी व्यक्तिमत्त्व, त्यांचं अंतरंग, त्यांच्यात असलेल्या प्रेम, दया, परोपकार, आपुलकी, देशप्रेम यासारख्या अनेक गुणांचं दर्शन घडतं. त्यांच्याप्रती अनेक मान्यवरांनी काढलेले गौरवोद्गार त्यांच्या विचारांचे तेजोवलय, अनेकांनी त्यांच्यावर लिहिलेले विविध लेख, चाहत्यांना आलेले त्यांचे विविध अनुभव यामुळे त्या त्या साहित्यिकाची विस्तृतपणे ओळख होते. ते सर्व पाहिल्यानंतर आपोआप हात जोडले जातात.

एक माणूस म्हणून त्यांनी जी आभाळाची उंची गाठलेली असते तिथपर्यंत सर्वसामान्य माणूस पोहोचू शकत नाही. त्यांनी मिळविलेलं स्थान हे खूप उंचीवर असणाऱ्या नभांगणातील तेजोमय ताऱ्यासारखं असतं जे इतरांना दिपवून टाकतं.

याचा प्रत्यय हे पुस्तक लिहिताना आला. स्वतःचं दुःख इतरांना न जाणवू देणारे, जीवनातील सर्वच आव्हाने हसतमुखाने स्वीकारून त्यांचा सामना करणारे हे तीन ज्ञानपीठ तपस्वी जितके असामान्य तितकेच महान! त्यांच्याकडून खूप काही शिकायला मिळालं म्हणून आम्हीही भाग्यवान!

या पुस्तकाचे वाचक स्वागत करतील अशी आशा आहे. वाचकांच्या सतत प्रोत्साहनामुळेच या पुस्तकांची निर्मिती झाली. म्हणूनच त्यांचे ऋण मान्य करायलाच हवेत.

कोमल प्रकाशनचे श्री. गुरूनाथ शेट्ये व सौ. कांचन शेट्ये यांचे सहकार्य नेहमीच मिळत असते. त्यांनी या पुस्तकासाठी मोलाचे सहकार्य केले. त्यांचे मनापासून आभार.

श्री. प्रकाश गवळी यांचेही मोलाचे सहकार्य मिळत असते. त्यांचेही विशेष आभार.

श्री. चंद्रशेखर बेगमपुरे यांनी या पुस्तकासाठी अतिशय सुंदर मुखपृष्ठ तयार करून दिले त्यांचेही आभार.

अनेक वाचक पत्र, फोन याद्वारे आपली प्रतिक्रिया व्यक्त करतात. त्यांच्याशी संवाद साधताना खूप समाधान मिळतं. अनेकांशी नवीन ओळखी झाल्या आणि एक अतूट नातं निर्माण झालं. जीवनात मिळालेलं हे वेगळं समाधान, जे माझ्या पुस्तकांनी मला दिलं आणि अलौकिक ठरलं. पुन्हा एकदा सर्व वाचकांचे मनापासून आभार.

डॉ. उषा खंदारे



**डॉ. उषा खंदारे**

एम.ए., एम.एड., पीएच.डी.

## -ययाति-

वैयक्तिक व सामाजिक जीवनात वासनांचे आणि विकारांचे नियंत्रण किंवा उदात्तीकरण करणारा मानव जोपर्यंत निर्माण होणार नाही, तोपर्यंत मानवतेला सुख आणि शांती यांची प्राप्ती होण्याचा संभव नाही. उलट यंत्रयुगाने जीवनाला आलेल्या वेगाने आणि भौतिक सौंदर्य व नैतिक कुरूपपणा यांच्या होऊ घातलेल्या विचित्र मिश्रणाने सामान्य माणसाची दु:खे वाढत जातील. जीवनातील संपूर्ण रस पिळून घेण्याच्या नादात मनुष्य अधिकाधिक विफल होत जाईल.

## -विशाखा-

प्रेम कुणावर करावं ?
कुणावरही करावं
कारण -

प्रेम आहे माणसाच्या संस्कृतीचा सारांश, त्याच्या इतिहासाचा निष्कर्ष आणि भविष्यकालातील त्याच्या अभ्युदयाची आशा एकमेव !

## -अष्टदर्शने

देणाऱ्याने देत जावे
घेणाऱ्याने घेत जावे
घेता घेता एक दिवस
देणाऱ्याचे हात घ्यावेत

कोमल प्रकाशन

₹ ३९०/-